# मोबाईल पत्रकारिता :पत्रकारितेचे नवे स्वरूप

**डॉ. संजय डाफ**
सहाय्यक प्राध्यापक
पदव्युत्तर शैक्षणिक जनसंवाद णवभाग
ग ◌ंडवाना णवद्यापीठ, गडणिर ली
Daf.sanjay@unigug.ac.in

## प्रस्तावना :

आज मोबाईल हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आज अन्न, वस्त्र आणि निवारा या नंतर मोबाईल ही मनुष्याची चवथी गरज झाली आहे, इतका मोबाईल आपल्या सवयीचा झाला आहे. अँन्ड्रॉईड मोबाईल वापरणारा भारत हा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश आहे. मोबाईल ने मनुष्याचे जीवनच बदलून टाकले आहे. त्यात प्रसार माध्यमे तरी कसे सुटणार. आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रसार माध्यमांच्या स्वरूपात अनेक बदल घडले आहे. त्यातीलच एक बदल म्हणजे मोबाईल पत्रकारिता. 'ब्रॉडकास्ट जर्नालिझम', 'पॉडकास्ट जर्नालिझम', असे वेगवेगळे प्रकार आहे तसाच हा एक नव्या पत्रकारितेला प्रकार आहे. आज मोबाईल चा वापर केवळ संवाद साधण्यासाठीच नाही तर वृत्तांकनासाठी होऊ लागला आहे. अनेक भाषांमधील वृत्त वाहिन्या मोबाईलच्या माध्यमातून काम करीत आहेत. केवळ वृत्तांकनासाठी नाही तर वृत्त निवेदनासाठी सुद्धा मोबाईलचा वापर होत आहे. कमी खर्चीक, सहज उपलब्ध आणि थेट संवाद साधता येत असल्याने मोबाईल पत्रकारिता आज पारंपरिक माध्यमांना पर्याय म्हणून पुढे आली आहे. वृत्त वाहिन्यांच्या बातमीदाराला एखाद्या ठिकाणी वृत्तांकन करायचे असेल तर मोठी कसरत करावी लागते. कॅमेरामन सोबतमोठे आणि वजनी कॅमेरे, कॅमेरा स्टँड, लाईव्हकिंवा 'ओबी व्हॅन'हे सर्व साहित्य घेऊन बातमीदार बातमी करायला

जातो. मोबाईल पत्रकारिता मध्ये हा सर्व व्याप नाही. फक्त एक छोटी मोबाईल किट घेऊन गेले तरी बातमी करता येते, इतके सोपे झाले आहे. म्हणजे कॅमेरामन चा खर्च नाही, महागडे कॅमेरे खरेदी करायची गरज नाही आणि 'ओबी व्हॅन' ची पण गरज नाही. सहज कुठेही बातमी करायला जाता येते आणि त्वरित ती पाठवून प्रसारित करता येते. थेट प्रक्षेपण करायचे असल्यास तेही अगदी सहज करता येते. मोबाईल वर 'एडिटिंग ॲप' च्या माध्यमातून बातमी संपादित आणि 'व्हॉईस ओव्हर' सुद्धा करता येते. म्हणजे बातमीवरील सर्व संस्कार आता मोबाईलणे करणे शक्य झाले आहे. त्यामुळे मोबाईल पत्रकारिता अल्पावधीत लोकप्रिय आणि फायद्याची ठरली आहे. मात्र, मोबाईल पत्रकारितेचे फायदे आहेत तसेच काही तोटेही आहेत. या संशोधन निबंधात आपण यावर विस्तृत चर्चा करणार आहोत.

**महत्वाचे शब्द :** अँन्ड्रॉईड मोबाईल, ओबी व्हॅन, एडिटिंग ॲप, व्हॉईस ओव्हर, ब्रॉडकास्ट जर्नालिझम, पॉडकास्ट जर्नालिझम, आयफोन, एडिटिंग, स्मार्टफोन, टॅबलेट, एडिटिंग ॲप्स, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, इंटरनेट, लाईव्ह युनिट, व्हॉटस ॲप, इंस्टाग्राम, यूट्यूब, फेक न्यूज, इंटरनेट रेंज, ब्रेकिंग, हार्डवेअर, सॉफ्टवेअर

## मोबाईल पत्रकारितेची संकल्पना :

मोबाईल पत्रकारिता म्हणजे 'अँन्ड्रॉईड' किंवा 'आयफोन' मोबाईलच्या सहाय्याने बातम्यांचे संकलन, संपादन आणि प्रसारित करणे. डिजिटल तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आपल्याला आज हे करणे शक्य झाले आहे. पारंपरिक माध्यमांमध्ये बातमी करताना लागणाऱ्या औपचारितेला या पद्धतीत फाटा देण्यात आला आहे. पारंपरिक पत्रकारितेमध्येलागणाऱ्या महागड्या साधनांच्या तुलनेत मोबाईल पत्रकारितेची साधने स्वस्त,सोपी, आणि उपयुक्त आहेत.पाच माणसांना करावी लागणारी कामे या पद्धतीत फक्त एक माणूस करू लागला आहे. त्यामुळे अल्पावधीत मोबाईल पत्रकारितेचा वापर माध्यमांनी सुरू केला आहे. कमी वेळेत, कमी मानुष्यबळा मध्ये आणि कमी खर्चात जास्तीत जास्त बातम्या माध्यमांना मिळू लागल्या आहेत. त्यामुळे इतर प्रतिस्पर्धी माध्यमांशी दोन हात करणे शक्य झाले आहे.

**मोबाईल पत्रकारितेचे मुख्य घटक :** स्मार्टफोन किंवा टॅबलेट, उच्च गुणवत्तेचा कॅमेरा व्हिडिओ एडिटिंग ॲप्स. उदा. (Power Director, Go Pro Quic,Adobe Rush, Kinemaster).

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स (Whats App, Facebook, Instagram, Twitter, YouTube).



## मोबाईल पत्रकारितेचा विकास :

### १. सुरुवातीचा काळ :

मोबाईल पत्रकारितेची सुरुवातसाधारणतः २००० च्या दशकाच्या सुरुवातीला झाली. त्यावेळी इंटरनेटचा प्रसार वाढायला सुरुवात झाली होती. स्मार्टफोनची बद्दल माहिती होऊ लागली होती. जसजशी स्मार्टफोन, अँड्रॉईड फोन येऊ लागले तसतसा त्याचा वापर वाढायला लागला. स्मार्ट फोन स्वस्त झाल्यावर त्याचा वापर पत्रकारीतेमध्ये वाढला.

### २. सामाजिक चळवळीतील योगदान :

अनेक सामाजिक चळवळींमध्ये मोबाईल पत्रकारितेचे मोठे योगदान आहे. केवळ भारतातच नाही तर जागतिक स्तरावर मोबाईल पत्रकारितेनेसामाजिक आणि राजकीय चळवळींमध्येमहत्त्वाची भूमिका बजावली आहे. अनेक चळवळी मोबाईल पत्रकारीतेमुळे मोठ्या झाल्या आहेत, अनेक प्रश्नांना न्याय मिळाला आहे.

### ३. आधुनिक युगात मोबाईल पत्रकारिता :

आज अनेक वृत्त वाहिन्या, वृत्तसंस्था मोबाईल च्या माध्यमातून पत्रकारिता करीत आहेत. उदा. बीबीसी मराठी, लोकशाही न्यूज, पीटीआय डिजिटल, सिएनएन. पत्रकार बातम्यांचे संकलन, एडिटिंग आणि थेट घटना स्थळावरून बातम्या देण्यासाठी स्मार्टफोनवर वापर करतात.




## मोबाईल पत्रकारितेचे फायदे :

### सुलभता आणि लवचिकता :

डिजिटल कॅमेराच्या तुलनेत स्मार्टफोन वापरण्यास हलका आहे. त्यामुळे कुठेही सहज नेता येते, वापरता येतो, बातमी संकलन करण्यासाठी अडचण येत नाही. ग्रामीण भागात किंवा कुठल्याही संकटग्रस्त, अडथळे असलेल्या ठिकाणाहून बातमी करणे शक्य होते.

### वेगवान :

कुठल्याही ठिकाणाहून बातमीचे थेट प्रक्षेपण करता येते. कमी वेळेत आणि अडथळे असले तरी मोबाईलच्या मदतीने बातमीचे थेट प्रक्षेपण होते. त्यासाठी फार तंत्रज्ञान लागत नाही. फक्त इंटरनेट रेंज चांगली असली पाहिजे.

### खर्चाची बचत :

मोबाईल पत्रकारिता करताना महागडे कॅमेरे, कॅमेरामन, महागडे लाईव्ह युनिट, ओबी व्हॅन यांची गरज नसते. फुटेज मुख्यालयात पाठविल्यावर संपादन करण्याची गरज पडत नाही. कारण मोबाईल वरून या सर्व प्रक्रिया करता येतात. त्यामुळे कमी खर्चात वृत्तांकन करता येते.

### सामाजिक माध्यमांशी जोडणी :

समाज माध्यमांद्वारे जगातील प्रेक्षकांशी थेट संवाद येतो. व्हॉटस ॲप, इंस्टाग्राम, यूट्यूब या माध्यमातून जगातील कुठल्याही कोपऱ्यातील लोकांशी संवाद साधने शक्य होते. विशेष वृत्त तयार करून समाज माध्यमांद्वारे प्रसारित केले जाणे शक्य होते.

### नागरिक पत्रकारिता :

मोबाईल पत्रकारितेमुळे सामान्य माणसाला सुद्धा पत्रकार होण्याची संधी मिळाली आहे. एखादी वृत्तसंस्था जर एखादी बातमी देत नसेल किंवा लपवित

असेल तर सामान्य व्यक्ती ती बातमी मोबाईलच्या माध्यमातून समाज माध्यमांवर प्रसारित करू शकते. यातून लोकशाहीची मूलतत्वे मजबूत होण्यास मदत होते.




## मोबाईल पत्रकारितेची आव्हाने :




## विश्वासार्हतेचा अभाव :

मोबाईल पत्राकारितेमुळे कुणीही कुठलीही बातमी खात्री न करता प्रसारित करतात. काहीवेळा ती बातमी चुकीची किंवा खोटी असते. त्यामुळे ‘फेक न्यूज’ चा प्रसार वाढतो. बातमी खरी आहे किंवा खोटी हे तपासणे कठीण जाते.

## गोपनीयता आणि सुरक्षा :

आज मोबाईल हॅक करणे कठीण नाही. त्यामुळे मोबाईल मध्ये महत्वाची माहिती असेल आणि मोबाईल हॅक झाला तर ही माहिती सार्वजनिक होऊ शकते. मोबाईल पत्रकारितेमध्ये मोबाईल डेटा हॅक होण्याचा धोका नेहमीच असतो.

## तांत्रिक अडचणी :

कॅमेराच्या तुलनेतमोबाईलची बॅटरी लहान असल्याने मोबाईल बंद होण्याची शक्यता नेहमीच असते. तसेच नेटवर्क ची समस्या कायम असते. घेतलेल्या व्हिडिओची गुणवत्ता ही कॅमेराच्या तुलनेत फारशी चांगली नसते, त्यात उच्च दर्जाचे संपादन कौशल्य आणि ॲप्स नसल्याने बातमीची गुणवत्ता प्रभावित होते.

## प्रशिक्षणाचा अभाव :

वृत्त वाहिन्यांमधील कॅमेरामनला कॅमेराचे रीतसर प्रशिक्षण दिले असते. मात्र, अनेक पत्रकारांना स्मार्टफोनद्वारे वृत्तांकनासाठी आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण दिले नसते. त्यामुळे त्यांच्यात कौशल्याचा अभाव असतो. सामान्य नागरिकांना प्रशिक्षण नसते. त्यामुळे दर्जा मिळत नाही.

## माहितीचा अतिरेक :

समाज माध्यमांवर कुठली माहिती आणि कितीवेळा टाकायची याला मर्यादा नसते. त्यामुळे अनेकदा माहितीचा अतिरेक होते, परिणामी महत्वाची माहिती, बातम्या मागे पडतात किंवा दुर्लक्षित होतात. अशावेळी महत्त्वाच्याबातम्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नाहीत.

## मोबाईल पत्रकारितेचा समाजावर प्रभाव :



**१. सामाजिक बदल :**

मोबाईल पत्रकारितेमुळे समाजातल्या शेवटच्या घटकांना जागतिक व्यासपीठ मिळाले आहे. असे अनेक विषय आहेत ज्या विषयांकडे पारंपरिक माध्यमांचे लक्ष जात नाही किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष जातात. अशा विषयांना स्मार्टफोनद्वारे जगासमोर आणले जातात.

**२. आपत्ती व्यवस्थापन :**

एखाद्या घटनेच्या वेळी त्या घटना स्थळावर असलेल्या लोकांकडून माहिती घेतली जाते. आणि स्मार्टफोनद्वारे ती त्वरित प्रसारित केली जाते. यामुळे मदतकार्य प्रभावीपणे होते आणि लोकांच्या प्राणाचे रक्षण होते.

**३. राजकीय संवाद :**

सध्या देशात आणि राज्यात राजकीय घडामोडी वाढल्या आहेत. लोकांचाही राजकीय बातम्यांमध्ये रस वाढत चालला आहे. त्यात कोण आधी राजकीय ब्रेकिंग देते याची माध्यमांमध्ये चढाओढ असते. मोबाईल पत्रकारितेमुळे स्मार्टफोन च्या माध्यमातून थेट आणि त्वरित प्रक्षेपण करणे शक्य होते.

**भविष्यातील संभाव्यता :**

मोबाईल पत्रकारिता ही उद्याच्याप्रगतपत्रकारितेची सुरुवात आहे. सध्या काही माध्यमांनी मोबाईल पत्रकारिता सुरू केली आहे. त्याचे त्यांना चांगले फायदे मिळत आहेत. भविष्यात यात आणखी सुधारणा होणार आहे. स्मार्टफोनच्या 'हार्डवेअर' आणि 'सॉफ्टवेअर'मधील सुधारणा, 5G नेटवर्कचाप्रसार, आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यामुळे मोबाईल पत्रकारिता अधिकप्रगत होईल.आधुनिक युग हे डिजिटल युग आहे. या डिजिटल युगात स्मार्टफोन च्या माध्यमातून क्षणात सर्व कामे होतील. त्यामुळे सर्व माध्यमे मोबाईल पत्रकारितेकडे वळतील, यात शंका वाटत नाही.

**शिफारसी :**

**१. प्रशिक्षण कार्यक्रम :**

मोबाईल पत्रकारिता ही आजच्या आधुनिक काळात उपयुक्त अशी आहे. मात्र, योग्य प्रशिक्षण नसल्याने पत्रकारांना अनेक अडचणी येतात. त्यामुळे पत्रकारांना मोबाईल उपकरणांचे योग्य वापराचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणामुळे त्यांचे काम अधिक जलद आणि उत्तम होईल.

**२. तथ्य पडताळणी प्रणाली :**

मोबाईल पत्रकारितेकडे माध्यमांचे भविष्य मानले जात असले तरी 'फेक न्यूज' अर्थात खोट्या आणि चुकीच्या बातम्या ही मोठी अडचण आहे. त्यामुळे विश्वासार्हतेला तडा जातो. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. फेक न्यूज रोखण्यासाठी सत्य पडताळणी तंत्राचा वापर केला जावा. जेणेकरून कोणतीबातमी खरी आणि कोणती खोटी हे कळेल.

**३. डेटा संरक्षण :**

हॅकर्स साठी मोबाईल हॅक करणे काही कठीण नाही, मात्र, यामुळे मोबाईल मधील महत्वाचा डेटा चोरी होऊ शकतो. त्यामुळे गोपनीयता जपण्यासाठी सुरक्षा उपायोजना करणे आवश्यक आहे. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा.

**४. नैतिकता आणि जबाबदारी :**

पत्रकारांची नैतिकता हा विषय नेहमीच चर्चिला जातो. त्यामुळे त्यांच्यावर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण होतात. अशावेळी पत्रकारांनी नैतिकतेच्या मर्यादेत राहून बातम्या प्रसारित कराव्यात.




**निरीक्षणे :**

आज मोबाईल पत्रकारितेकडे नवे संवाद माध्यम म्हणून बघितले जाते. या माध्यमामुळे सर्वसामान्यांना आपला आवाज संबंधित व्यवस्थेपर्यंत पोहचविणे सोपे झाले आहे. लोकांना न्याय मिळण्यास मदत होत आहे. स्मार्टफोन आणि इंटरनेट च्या वापरामुळे माहितीचा

प्रसार जलद, प्रभावी आणि कमी खर्चिक झाला आहे. असे असले तरी या माध्यमावरील विश्वास आणि नैतिकता मोठा प्रश्न आहे. ती टिकविण्याची मोठी

जबाबदारी आहे. मोबाईल पत्रकारितेने माहिती संवादाचा नवा अध्याय उघडला आहे योग्य नियोजन, तांत्रिककौशल्ये, आणि नैतिक मूल्ये अंगीकारून मोबाईल पत्रकारिता लोकशाहीसाठी एक प्रभावी साधन ठरू शकते.

## संदर्भ सूची


१. Digital communication :Dr.I. S. Chitode, 2012. Technical Publications

२. इंटरनेट पत्रकारिता : सुरेश कुमार, तक्षशीला प्रकाशन, २००४

३. आजकालची पत्रकारिता : डॉ. वि. ला. धारूरकर, चैतन्य प्रकाशन,

४. जनसंवाद सिद्धांत आणि व्यवहार : रमा पोटदुखे-गोळवळकर, श्री. मंगेश प्रकाशन २००५

५.Digital Journalism; Understanding Citizen and MobileReporting :StuartAllan, 2017.

६. Mobile Journalism ; Redefining News in the Digital Age :Alfred Hermida,2014

७. ‘The Rise of Mobile Journalism in India’ :Publish in Indian Journal of Media Studies,P. Srivastava, 2020.


International Research Journal
IJNRD
Research Through Innovation